ePaper

**येत्या 14 तारखेला सुप्रीम कोर्टात शिवसेना पक्ष आणि चिन्हाची सुनावणी!**

| वर्ष - 8 | अंक - 331 | UDYAM-MH-26-0158827 |




# महाईन्यूज ™

**आतील पानांत**


- गिल आणि सारा लंडनमध्ये दिसले!
- महावशने टी-10 लीगमध्ये खरेदी केला संघ
- भारत, नामिबियादरम्यान करार
- चीनचा भारताविरोधी वॉटर बॉंब


www.mahaenews.com | गुरुवार, दि. 10 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## राहुल गांधी संतापले, भव्य मोर्चा घेऊन निवडणूक आयोग कार्यालयावर धडक, आयोगावर बेछूट आरोप !

# बिहार निवडणूकही 'हायजॅक'?

## निवडणूक आयोग आहे का? आरएसएस, भाजप ची शाखा : राहुल गांधी यांचा निशाणा !

| पाटणा | प्रतिनिधी | महाईन्यूज

**निवडणूक आयोग हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ किंवा भारतीय जनता पार्टीची शाखा असल्यासारखी उत्तरे देत आहे. त्यामुळे, त्यांची भूमिका स्पष्ट आहे. महाराष्ट्र प्रमाणेच बिहारमधील आगामी निवडणूक 'हायजॅक' करण्याचा प्रयत्न होतो की काय? अशी शंका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी धडक मोर्चासमोर बोलताना व्यक्त केली.**

### बिहार निवडणूकही चोरणार ?

महाराष्ट्रानंतर बिहारमध्येही निवडणूक चोरण्याचा प्रयत्न होणार आहे कार्यकर्त्यांनी सावधगिरी बाळगली पाहिजे आणि सतर्क राहिले पाहिजे. निवडणूक आयोगाचे आयुक्त संघ परिवार किंवा भाजपाचे प्रवक्ते असल्यासारखे बोलू लागले आहेत, असा राहुल गांधी यांनी गंभीर आरोप केला आहे. बिहारमधील पाटणा येथे विरोधकांतर्फे निघालेल्या धडक मोर्चात ते बोलत होते.

### मतदार याद्याच बोगस

बिहारमधील मतदार याद्यांच्या तपासणीला विरोधी पक्ष विरोध करत आहेत. त्याचा उल्लेख करून राहुल गांधी यांनी आरोप केला की ज्याप्रमाणे महाराष्ट्राच्या निवडणुका चोरीला गेल्या, त्याचप्रमाणे बिहारच्या निवडणुका चोरण्याचा प्रयत्न केला जाईल. आम्हाला महाराष्ट्र मॉडेल समजले आहे, हे भाजपाच्याही लक्षात आले आहे. त्यांनी आता 'बिहार मॉडेल' आणले आहे. गरिबांची मते हिसकावून घेण्याचा हा एक मार्ग आहे, त्या विरोधात आपण लढा उभा केला पाहिजे आणि भाजपाचे हे कारस्थान हाणून पाडले पाहिजे, असेही ते म्हणाले.

### ..नंतर कायदा मात करेल !

निवडणूक आयोगाच्या बिहारमधील कार्यालयावर भारतीय जनता पार्टीचे घटक पक्ष असलेल्यांच्या 'एनडीए' च्या निषेधार्थ राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात प्रचंड प्रमाणावर कार्यकर्ते उपस्थित होते. प्रामुख्याने 'इंडी' आघाडीचा प्रचार करण्यासाठीच राहुल गांधी पाटण्यामध्ये आले होते. राहुल म्हणाले की, तुम्हाला जे करायचे आहे ते करा, पण नंतर कायदा तुमच्यावर मात करेल. कायदा तुम्हाला सोडणार नाही.

### महाराष्ट्रात काय घडले पाहा..

समोरच्या हजारो मतदारांशी संवाद साधताना ते म्हणाले, की मी तुम्हाला हमी देतो, की नरेंद्र मोदी आणि त्यांचे आघाडीतील पक्ष कितीही मोठे असलात तरी कायदा तुम्हाला सोडणार नाही. तुम्ही तुमचे काम करत नाही, हे




प्रथम लक्षात घ्या. राहुल म्हणाले, की काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्रात लोकसभा निवडणुका झाल्या. त्यानंतर काही महिन्यांनी महाराष्ट्र आणि हरियाणामध्ये विधानसभा निवडणुका झाल्या. आपल्या 'इंडी' आघाडीने लोकसभा निवडणुका जिंकल्या. पण, काही महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुका मात्र हरल्या, हे कशामुळे झाले याचा विचार करा आणि सतर्क राहा.

### तब्बल एक कोटी नवे मतदार ?

त्यांनी पुढे स्पष्ट केले, की त्यावेळी आम्ही जास्त काही बोललो नाही. काही काळानंतर, आम्ही डेटा पाहण्यास आणि तपासण्यास सुरुवात केली. आम्हाला आढळले की लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकीत एक कोटी नवीन मतदार जोडले गेले. म्हणजे विधानसभा निवडणुकीत दहा टक्के अधिक मतदारांनी मतदान केले. जेव्हा आम्हाला हे मतदार कुठून आले, ते कोण आहेत, हे कळले तेव्हा आश्चर्यकारक गोष्टी समोर आल्या, असा खुलासाही त्यांनी केला. ज्या मतदार संघामध्ये मतदारांची संख्या वाढली, तेथे भाजपा जिंकला. सर्व नवीन मते भाजपाला गेली. असे कसे होऊ शकते? मग या डावपेचामधील गौडबंगाल समजले, असे राहुल गांधी म्हणाले.

### निवडणूक आयोगाची चुप्पी..

यानंतर, जेव्हा आम्ही मतदार यादी आणि मतदानाचा व्हीडिओ मागितला, तेव्हा निवडणूक आयोग गप्प बसला. एकही शब्द बोलला नाही. एकदा नाही, तर अनेक वेळा त्यांना सांगितले की कायद्यानुसार आम्हाला मतदार यादी दिली पाहिजे. कायद्यानुसार व्हीडिओग्राफी आम्हाला दिली पाहिजे. पण निवडणूक आयोग ढिम्म ! आजपर्यंत महाराष्ट्राची मतदार यादी आम्हाला देण्यात आलेली नाही. याउलट, त्यानंतर व्हीडिओ देण्याचा कायदा बदलण्यात आला आहे, हाही एक वेगळाच भाग आहे, असे संताप जनक उद्गार त्यांनी काढले.

### राहुल गांधी यांचा थयथयाट कशासाठी?

निवडणुका हरल्यानंतर जाग येणाऱ्या राहुल गांधी यांचा थरथराट कशासाठी ? असा प्रश्न भाजपाच्या प्रवक्त्यांनी चर्चेदरम्यान विचारला आहे. आपले लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कामे, त्यांची दूरदृष्टी आणि सर्वांच्या विकासासाठी त्यांचे योगदान पाहता, भारतीय जनता पार्टी आत्ताच काय, पुढील दहा वर्षे निवडणूक हरणार नाही, असे या प्रवक्त्याने ठणकावले आहे. देशातील बळीराजा, महिला, युवा वर्ग डोळ्यासमोर ठेवून भाजपाची तळागाळापर्यंत पोहचण्याची व्यूहरचना असते, हे ऐनवेळी जागे होणाऱ्या राहुल गांधींना कोण सांगणार? असे हा प्रवक्ता म्हणाला.

### मतदार यादी मागणारे पत्र..

दरम्यान, महाराष्ट्राच्या निवडणुकीत अनियमिततेच्या आरोपांबाबत काँग्रेसने दि. २५ जूनरोजी निवडणूक आयोगाला पत्र लिहिले होते. पक्षाने आयोगाला आठवडाभरात महाराष्ट्र निवडणुकीची डिजिटल मतदार यादी मागितली होती. महाराष्ट्र आणि हरियाणामधील मतदानाचे व्हीडिओही मागितले होते. काँग्रेसने म्हटले होते, की ही जुनी मागणी आहे आणि निवडणूक आयोग ती सहज देऊ शकते. डेटा मिळाल्यावर आम्ही विश्लेषण करू आणि निवडणूक आयोगाशी चर्चा करू. यापूर्वी दि. १२ जूनरोजी निवडणूक आयोगाने मला पत्र लिहून निवडणुकीत हेराफेरीच्या आरोपांवर चर्चेसाठी बोलावले होते. त्याला उत्तर म्हणून काँग्रेसने आयोगाला पत्र लिहिले होते, त्याचे उत्तर मिळाले पण ते अतिशय निराशाजनक आहे, असेही त्यांनी सांगितले.

# ऑनलाइन गेमिंगसाठी कायदा व्हावा!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानपरिषदेत माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'जुगार ॲपच्या जाहिरातींमुळे युवकांमध्ये व्यसनाधीनता वाढली आहे. आर्थिक हव्यासापोटी व जाहिरातबाजीला बळी पडून युवक ऑनलाइन गेमिंगकडे आकर्षित होत आहेत. ऑनलाइन गेममुळे चार जणांनी आत्महत्या, तर दोन हत्या झाल्या आहेत. ऑनलाइन लॉटरी, ऑनलाइन गेम यांचे विनियमन करण्यासाठी कायदा करण्याबाबत केंद्र सरकारकडे विनंती केली आहे,' अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली.**



### जुगार जाहिरात करण्यावर बंदी

त्यातून त्याने राहत्या इमारतीच्या १४ व्या मजल्यावरुन उडी मारून आत्महत्या केली होती. 'राज्यात ऑनलाइन जुगार ॲप तसेच जुगार जाहिरात करण्यावर बंदी आणून युवकांना जुगाराच्या व्यसनापासून मुक्त करण्यासाठी कोणती कार्यवाही, उपाययोजना करण्यात येत आहेत,' असा प्रश्न भाजप आमदार चित्रा वाघ, प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, निरंजन डावखरे यांनी विचारला होता. त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखी उत्तर दिले आहे.'ऑनलाइन गेमच्या व्यसनातून किवळे येथील एका युवकाने राहत्या इमारतीच्या १४ व्या मजल्यावरुन उडी टाकून आत्महत्या केल्याचे खरे आहे. याबाबत पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या रावेत ठाण्यात गुन्हा नोंद आहे.

पिंपरी-चिंचवडमधील किवळेत १६ वर्षीय युवकाला ऑनलाइन गेमचे व्यसन जडले होते. त्यातून त्याने राहत्या इमारतीच्या १४ व्या मजल्यावरुन उडी मारून आत्महत्या केली होती. 'राज्यात ऑनलाइन जुगार ॲप तसेच जुगार जाहिरात करण्यावर बंदी आणून युवकांना जुगाराच्या व्यसनापासून मुक्त करण्यासाठी कोणती कार्यवाही, उपाययोजना करण्यात येत आहेत,' असा प्रश्न भाजप आमदार चित्रा वाघ, प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, निरंजन डावखरे यांनी विचारला होता. त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखी उत्तर दिले आहे.

'ऑनलाइन गेमच्या व्यसनातून किवळे येथील एका युवकाने राहत्या इमारतीच्या १४ व्या मजल्यावरुन उडी टाकून आत्महत्या केल्याचे खरे आहे. याबाबत पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या रावेत ठाण्यात गुन्हा नोंद आहे. आर्थिक हव्यासापोटी व जाहिरातबाजीला बळी पडून युवक वर्ग युवक ऑनलाइन गेमिंगकडे आकर्षित होत आहेत.

ऑनलाइन गेमिंगमुळे नाशिक ग्रामीण येथे सन २०२१ मध्ये एक, गोंदियात २०२३ मध्ये एक, पिंपरी-चिंचवडमध्ये २०२४ मध्ये एक आत्महत्या आणि २०२५ मध्ये धाराशीव जिल्ह्यात दोन हत्या व एका आत्महत्येबाबत गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. तसेच, ऑनलाइन गेमिंगमुळे आर्थिक फसवणूक झाल्याने नवी मुंबईत सन २०२५ मध्ये एक आणि नाशिक ग्रामीण येथे सन २०२२ ते २०२५ या कालावधीत ११ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.ऑनलाइन जुगारास आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सायबर कार्यालयामार्फत समाजमाध्यमांवरुन तसेच प्रत्यक्ष सायबर जनजागृती कार्यक्रम राबवून जनजागृती करण्यात येत आहे. ऑनलाइन गेम बंद करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे विशेष कायदे अस्तित्वात नाहीत. परंतु, ऑनलाइन गेमवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फतच्या माहिती व तंत्रज्ञान कायद्यांतर्गतचे नियम भारतीय राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहेत. ऑनलाइन लॉटरी, ऑनलाइन गेमिंगचे विनियमन करण्यासाठी कायदा करण्याबाबत केंद्र सरकारकडे विनंती केली आहे,' असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.पिंपरी-चिंचवडमधील किवळेत १६ वर्षीय युवकाला ऑनलाइन गेमचे व्यसन जडले होते.

---

# कॅन्टोन्मेंटचा भाग महापालिकेत येणार?

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत आज मुंबईत बैठक

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या हद्दीलगत असलेल्या पुणे तसेच खडकी कॅन्टोन्मेंटमधील नागरी परिसराचा समावेश महापालिकेत करण्याबाबत लवकरच अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबई येथे कॅन्टोन्मेंटमधील नागरी भागाचे महापालिकेत विलीनीकरण करण्याबाबत (आज) गुरुवारी बैठक होत आहे. या बैठकीकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.**



### विलीनीकरणाचा ठोस निर्णय

आगामी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकार पुणे व खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या विलीनीकरणाचा ठोस निर्णय गुरुवारी होणाऱ्या बैठकीत घेऊ शकते. त्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून नियोजन केले जात असल्याची चर्चा महापालिकेत सुरू आहे. त्यामुळे आता विलीनीकरणाची घोषणा झाल्यास त्याचा परिणाम महापालिकेच्या आगामी निवडणुकीवर होणार आहे.

महापालिकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार असल्याने राज्य सरकारने पुन्हा कॅन्टोन्मेंटच्या विलीनीकरणाचा मुद्दा पुढे आणला आहे. यासंदर्भातच गुरुवारी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक होणार आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्यासह अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी या बैठकीमध्ये सहभागी होणार आहेत.या बैठकीमध्ये मुख्यमंत्री फडणवीस हे कॅन्टोन्मेंट विलीनीकरण करण्याबाबत राज्य सरकार ठोस भूमिका घेणार का? महापालिकेच्या निवडणुकीपूर्वी कॅन्टोन्मेंटचे महापालिकेत विलीनीकरण होणार का? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.आगामी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकार पुणे व खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या विलीनीकरणाचा ठोस निर्णय गुरुवारी होणाऱ्या बैठकीत घेऊ शकते.

त्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून नियोजन केले जात असल्याची चर्चा महापालिकेत सुरू आहे. त्यामुळे आता विलीनीकरणाची घोषणा झाल्यास त्याचा परिणाम महापालिकेच्या आगामी निवडणुकीवर होणार आहे. या निर्णयामुळे महापालिकेच्या प्रभाग रचनेतही बदल होण्याची शक्यता आहे. भवानी पेठ आणि ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत यामुळे वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महापालिकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार असल्याने राज्य सरकारने पुन्हा कॅन्टोन्मेंटच्या विलीनीकरणाचा मुद्दा पुढे आणला आहे. यासंदर्भातच गुरुवारी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक होणार आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्यासह अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी या बैठकीमध्ये सहभागी होणार आहेत.या बैठकीमध्ये मुख्यमंत्री फडणवीस हे कॅन्टोन्मेंट विलीनीकरण करण्याबाबत राज्य सरकार ठोस भूमिका घेणार का? महापालिकेच्या निवडणुकीपूर्वी कॅन्टोन्मेंटचे महापालिकेत विलीनीकरण होणार का? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

## कॅबिनेट मंत्री दादा भुसे यांची विधिमंडळ सभागृहात ग्वाही

# पुणे रिंगरोड, नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर वेळेत पूर्ण करणार!

## पुणे-पिंपरी-चिंचवड वाहतूक कोंडीमुक्तीसाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेणार!

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक कोंडीच्या समस्येबाबत विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन संपण्यापूर्वी आढावा बैठक घेण्यात येईल. त्यामध्ये महानगरपालिका, एमआयडीसी, पीएमआरडीए, राष्ट्रीय महामार्ग अशा संबंधित अधिकाऱ्यांना 'कालबद्ध' कार्यक्रम आखून देण्यात येईल. भूसंपादनाचा प्रमुख अडथळा असल्यामुळे मुख्यमंत्री- उपमुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सरकार सकारात्मक भूमिका घेईल. पुणे रिंगरोड, नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर यासारख्या प्रमुख प्रकल्पांचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी 'ॲक्शन प्लॅन' तयार केला जाईल, असे आश्वासन कॅबिनेट मंत्री दादा भुसे यांनी दिले.**



विधानसभा पावसाळी अधिवेशन मुंबई येथे सुरू आहे. त्यापार्श्वभूमीवर पुणे रिंगरोडचे काम रखडले असून, त्याला गती मिळावी. यासह शहराच्या सभोवताली व अंतर्गत रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्राधान्याने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी दौंडचे आमदार राहुल कुल आणि आमदार महेश लांडगे यांनी लक्षवेधीद्वारे केली.

आमदार राहुल कुल म्हणाले की, पुण्यातील वाहतूक कोंडीमुळे सर्वसामान्य नागरिकांना मनःस्ताप होतो आहे. शहराच्या अंतर्गत रस्त्यांवरील वाहतूक कोंडी आणि शहराला जोडणारे रस्ते आणि त्यावरील वाहतूक समस्या असे दोन वेगळे विषय आहेत. महायुती सरकारने हडपसर ते यवत आणि पुणे ते शिरुर आणि पुणे रिंगरोडच्या कामाला मंजुरी दिली. सदर मार्ग ४ वर्षांत पूर्ण करण्यात येणार आहेत. असे असले तरी निश्चित कालावधीमध्ये प्रकल्प पूर्ण होण्यासाठी समन्वय यंत्रणा तयार करावी. प्रत्येक महिन्याला बैठक घेवून प्रकल्पाची प्रगतीबाबत लोकप्रतिनिधींना अवगत करावे. रस्त्यांची दुरावस्था, अतिक्रमण आणि स्मार्ट सिटीमुळे रस्त्यांची रुंदी कमी झाली आणि फूटपाथ स्मार्ट झाले. त्यामुळे पुणे आणि परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, हिंजवडी आयटी हब, ऑटो हब, पुणे विमानतळ अशा महत्त्वाच्या ठिकाणांच्या मध्यावर असलेले पुणे-पिंपरी-चिंचवड शहर मोठ्याप्रमाणात विस्तारीत होत आहे. वाहतूक समस्या मोठ्या प्रमाणात आहे. नागरिकांमध्ये नाराजी आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये पुढील वर्षभरात १ लाखाहून अधिक वाहने रस्त्यावर येणार आहेत. तळेगाव- शिक्रापूर, वाघोली-शिरुर, हडपसर- दौंड या रस्त्याचे काम सुरू होते आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सरकारचे आभार आहेत. पण, पुणे रिंग रोड, पुणे-नाशिक महामार्गावरील नाशिक फाटा ते खेड या एलिव्हेटेड कॉरिडॉरचे काम भूसंपादनाअभावी रखडले आहे. तसेच, पुणे-बेंगलोर महामार्ग आणि हिंजवडी आयटी हब कोंडीमुक्त करण्यासाठी रस्त्यांच्या प्रस्तावित कामांना गती देण्याची आवश्यकता आहे.

### अधिकारी- लोकप्रतिनिधी बैठक घ्या...

पुणे-नाशिक महामार्गासाठी भूसंपादन करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपलिका, पीएमआरडीए सोबत राज्य सरकारने निधी उभारावा. हिंजवडी आयटी हबची जगभरात ओळख आहे. पण, काही दिवसांपूर्वी पावसामुळे रस्ते कॅनॉल झाले. रस्त्यांची कामे निश्चित वेळेत पूर्ण होत नाहीत. कारण, भूसंपादनासाठी शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत नाही. चांगला परतावा दिल्यास शेतकरी जागा देतील. भूसंपादनासाठी अडचणी येत आहेत, तर जिल्हाधिकारी प्रशासनाने 'इंटीग्रेटेड ऑथॉरिटी' तयार करावी. २०३० पर्यंत "महाराष्ट्र फाईव्ह ट्रिलियन इकॉनॉमी" असा संकल्प मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला आहे. त्यामध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराचे योगदान राहणार आहे. पण, त्यासाठी लागणाऱ्या मूलभूत सोयी-सुविधांमधील प्रमुख सेवा रस्ते आहेत. त्यामुळे रस्ते ट्रॅफिकमुक्त झाले पाहिजेत. यावर उपाययोजना करण्यासाठी पुणे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घ्यावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली.

"पुणे रिंगरोड, पुणे-बेंगलोर महामार्ग, पुणे-नाशिक महामार्ग याच्या प्रस्तावित कामांसाठी संबंधित विभागाचे अधिकारी यांची बैठक अधिवेशन संपण्यापूर्वी नियोजित केली जाईल. स्थानिक पातळीवर असलेल्या अडीअडचणी सोडवण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. शेतकऱ्यांना विश्वासात घेवून भूसंपादन करीत आहोत. 9 पॅकेजमध्ये पुणे रिंगरोड होणार आहे. त्याचे काम सुरू झाले आहे. आगामी 3 वर्षांत रिंगरोड पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

- **दादा भुसे,** कॅबिनेट मंत्री, महाराष्ट्र राज्य.

---

## बचत गटांना वस्तूंच्या विक्रीसाठी मिळाले हक्काचे व्यासपीठ

## पिंपरी चिंचवड महापालिकेचा उपक्रम; 'सक्षमा एसएचजी ई-पोर्टल'चे उद्घाटन

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवडः महिला सक्षमीकरणासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका विविध स्तरांवर प्रयत्नशील आहे. महापालिका समाज विकास विभाग आणि टाटा स्ट्राईव्हने तयार केलेल्या 'SHG ई-पोर्टल'वरील 'सक्षमा' पेजमुळे महिलांना स्वतःच्या हातांनी बनविलेल्या वस्तू विक्रीसाठी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. यामुळे महिला रोजगारनिर्मितीच्या संधी मोठ्या प्रमाणावर निर्माण होतील असे प्रतिपादन महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिका समाज विकास विभाग आणि टाटा स्ट्राईव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'सक्षमा प्रकल्पा' अंतर्गत महिला बचत गटांच्या वस्तू विक्रीसाठी तयार करण्यात आलेल्या 'SHG ई-पोर्टल'वरील 'सक्षमा' पेजचे उद्घाटन प्रसंगी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह हे बोलत होते.

या उद्घाटनप्रसंगी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उप आयुक्त ममता शिंदे, सहाय्यक समाज विकास अधिकारी संतोषी चोरघे, तसेच टाटा स्ट्राईव्हचे प्रतिनिधी अमेय वंजारी, बिचिथा जॉयसे, स्नेहल विचारे, सचिन उपाध्याय, संतोष डोंगरे, अश्विनी सांगेकर आदी मान्यवर उपस्थित होते. या नव्या डिजिटल उपक्रमाच्या माध्यमातून महिलांनी बनविलेल्या वस्तूंना नव्या बाजारपेठा उपलब्ध होतील आणि त्यातून रोजगार व उत्पन्नाच्या संधी मोठ्या प्रमाणावर निर्माण होतील. सक्षमा प्रकल्पाअंतर्गत आतापर्यंत ८ महिला फेडरेशनची स्थापना करण्यात आली आहे. या फेडरेशनद्वारे महिलांना व्यावसायिक संधी आणि सक्षमीकरणासाठी भक्कम आधार देण्यात येत आहे. या कार्यक्रमात आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी बनविलेल्या वस्तूंची प्रत्यक्ष पाहणी केली आणि त्यांचे कौतुक केले. या वस्तूंमध्ये स्थानिक, हस्तकलेच्या, उपयुक्त गृहवस्तूंचा समावेश होता. कार्यक्रमात विविध क्षेत्रीय कार्यालयांतील फेडरेशनच्या महिला पदाधिकाऱ्यांचा प्रोत्साहनपर सन्मान करण्यात आला.

"पिंपरी चिंचवड शहरातील महिलांच्या शाश्वत विकासासाठी शाश्वत रोजगार अत्यावश्यक आहे. फेडरेशन निर्मितीद्वारे महिलांना उद्योगशीलतेच्या संधी मिळणार असून समाज विकास विभागाच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या ई-पोर्टलमुळे महिला बचत गटांच्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.

- **प्रदीप जांभळे-पाटील,**
अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

"पिंपरी चिंचवड शहरातील महिलांमध्ये विविध कौशल्ये आहेत, परंतु त्यासाठी योग्य बाजारपेठ मिळवणे मोठे आव्हान होते. आजच्या डिजिटल युगात सक्षमा ई-पोर्टल हे त्या दृष्टीने एक मोठे पाऊल आहे. समाज विकास विभागाच्या मार्फत शहरातील सर्व महिलांनी याचा लाभ देण्याचा प्रयत्न आहे.

—**ममता शिंदे,**
उप आयुक्त, समाज विकास विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



'स्टेट'मेंट
राहुल जगताप

### नाम घेण्याचा निश्चय करावा.

जे दृश्य असते ते आज ना उद्या नाश पावते. दृश्य हे स्वतंत्र नसते, भगवंताच्या अधीन असते. म्हणून, जगात जी जी गोष्ट घडते ती ती भगवंताच्या इच्छेनेच घडते हे आपण ओळखावे. आपला देह दृश्यच आहे, आणि त्याला चालविणारा भगवंत देहात आहे; त्याच्या अनुसंधानात राहण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. हे अनुसंधान राहणे भगवंताच्या नामाने साधते, म्हणून तुम्ही सर्वांनी नाम घेण्याचा निश्चय करावा. आपले चित्त नामामध्ये गुंतले म्हणजे देहाला प्रारब्धाच्या स्वाधीन करता येते. ही युक्ती ज्याला साधली त्याला सुखदु:खाची बाधा उरली नाही. संतांना देखील त्यांचे प्रारब्ध भोगावे लागते, पण त्यांना देहबुद्धी नसल्याने भोगाचे सुखदु:ख नाही. व्यवहाराच्या मार्गाने जात असता भगवंताचे नाम कधी विसरू नये. आपल्या प्रयत्नाला जे फळ येईल ती भगवंताची इच्छा समजून, जे पदरात पडेल त्यात समाधान मानावे. आपण प्रपंची लोक आहोत, म्हणून प्रपंचाला उचित असणारा प्रयत्न केल्यावाचून कधी राहू नये; पण प्रपंच हेच आपले सर्वस्व आहे असे न समजता, त्यामध्ये भगवंताला विसरू नये. परमार्थाला सदाचरणाची फार जरुरी आहे. उगीच भलत्याच्या सांगण्याला भुलू नये, आणि अनीति-अधर्माच्या मार्गाला जाऊ नये. संत जे सांगतात त्याच्यावर विश्वास ठेवून, मुखात नाम ठेवावे आणि सदाचरणाने वागून प्रपंच करावा. असे जो वागेल त्याचे कल्याण राम खात्रीने करील हे मी सर्वांना वचन देतो. बहुतेकांना प्रपंचासाठी देव पाहिजे असतो. खरोखर, हे सर्व हिंग-जिऱ्याचेच गिऱ्हाईक आहेत; देवासाठी देव पाहिजे असे म्हणणारा खरा कस्तुरीचा चाहताच कोणी भेटत नाही. जो बरा होणार नाही अशा रोग्याला बरा करतो तो डॉक्टर खरा. अगदी विषयातल्या माणसांनासुद्धा जो बाहेर काढतो तो संत खरा. त्याच्याजवळ जाऊन नुसते ' मी शरण आलो आहे ' असे म्हटले तरी पुरे होते. हल्लीच्या आणि पूर्वीच्या प्रपंचात तसा फरक नाही; पण पूर्वी लोक देवाला विसरत नसत, अलीकडे ते जास्त संकुचित झाले आहेत. पूर्वी खेडेगावांमध्ये स्वाभाविकपणे एकमेकांच्या उपयोगी पडावे अशी बुद्धी असायची, पण आता काळ पालटला आहे. तुम्हा इतक्या लोकांना नामस्मरण करताना पाहून मला एक समाधान वाटते की, मला जी गोष्ट आवडते ती इतक्या लोकांना आवडू लागली आहे. मी सांगितलेले तेवढे करीन असा निश्चय करा. कशाचीही काळजी करू नका, मी तुमचा भार घेतलेला आहे ही जाणीव ठेवून आनंदाने प्रपंच करा.

बोधवचन:- भगवंताच्या नामाचा नाद लागला तर दुःखाची जाणीव कमी होईल. दुःखाची जाणीव नसल्यावर, दुःख असले म्हणून बिघडले कुठे ?

# ठाकरे पॅटर्नचा होतोय क्लेम, कुणावर नेम, कुणाचा गेम?



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**उद्धव आणि राज या ठाकरे बंधूंचा विजयी मेळावा पार पडला का यशस्वीपणे पार पाडला गेला ? याची आता राजकीय पटलावर उघडपणे चर्चा सुरू आहे. ठाकरे बंधूंचे कार्यकर्ते 'ठाकरे पॅटर्न'चा 'क्लेम' करीत असले तरी यामध्ये 'कुणीतरी' डाव टाकून एकावर 'नेम' धरला आणि एकाचा 'गेम' केला, अशी चर्चा मात्र जोरात सुरू झाली आहे. राजकीय बुद्धिबळाच्या खेळातील 'राजा' एकटा पडला आहे आणि 'वजीर' कोणती भूमिका घेतो, याकडे लक्ष लागले आहे !**



### 'ठाकरे पॅटर्न 'ची गरज कोणाला?

ठाकरे बंधूंचे मनोमीलन हा मुद्दा चर्चेला घ्यायचा तर एकत्र येण्याची जास्ती गरज कोणाला होती याची फोड करायला हवी ! जशी ती उद्धव ठाकरे यांना होती, तशीच ती राज यांनाही होती..प्रमाण थोडेफार कमी जास्त असेल, पण दोघे एकत्र आले तरच पुढील दिशा स्पष्ट दिसणार आहे, नाहीतर भवितव्य अंधारमय आहे, हे कोणीही मान्य करेल!

### खूप गमावले, थोडे तरी कमावण्यासाठी!

खूप काही गमावले, म्हणून पुन्हा किमान काहीतरी कमावण्यासाठी भाऊबंदकी विसरून राज यांची ही गळाभेट नक्कीच झाली नव्हती. राज यांचा आजवर अनेक चाणाक्ष नेत्यांनी तोंडी लावण्यासाठी मोठ्या खुबीने उपयोग करून घेतला आहे आणि उद्धव यांनी तर अगदी उघड करवून घेतलेला आहे. त्यातूनच राज यांच्याकडे राजकारणातले डावपेच समजणारे आणि ज्यांची गुप्त मैत्री आजही उद्धव सेनेतल्या काही उरल्या सुरल्या नेत्यांशी आहे, हे लक्षात घ्या ! त्यांना राज यांचे उद्धव यांच्याबरोबर जमवून घेणे दूरदूरपर्यंत मुळीच आवडलेले नाही. किंबहुना, निदान यावेळी तरी पूर्वीसारखे बेसावध राहून त्यांना जाऊन बिलगू नका, असा अगदी तोंडावर प्रेमाचा आणि मोलाचा सल्ला त्यांना पक्षातल्या आणि पक्षाबाहेरच्या अनेकांनी दिला आहे.

### बेसावध आणि भावनिक ठेवण्यासाठी..

केवळ म्हणूनच राज यांना बेसावध आणि भावनिक ठेवण्यासाठी उद्धव आपल्या भाषणातून, एकत्र आलो..एकत्र राहण्यासाठी.. असे म्हणाले. ही सुरुवात आहे, असेही ते म्हणाले. थोडक्यात, उद्धव जरी एकी दाखवण्यासाठी तशी वातावरण निर्मिती करायला अधिक उत्सुक वाटले, तरी ती पुन्हा उद्धव यांची पूर्वीसारखी तात्पुरती गरज आहे, हेच वास्तव आहे ! कारण मराठी माणसाला उद्धव-राज यांचे एकत्र येणे जरी मनापासून भावलेले असले, तरी जेव्हा केव्हा या दोघांना कुठेतरी, कोठेतरी सत्तेची संधी चालून येईल, तेव्हा जनतेच्या मनातल्या राज यांना उद्धव कधीही सत्तेत मानाचे स्थान अगदी शंभर टक्के देणार नाही, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. याउलट, राज यांनी तसा हट्ट धरल्यास पुढल्या क्षणी वेगळे व्हायला उद्धव क्षणाचाही विलंब लावणारे नाहीत, हे जनता ओळखून आहे.

### फक्त मराठीचा मुद्दा, राजकीय अजेंडा नाही!

हे लक्षात घेऊनच राज यांनी 'महायुती' वर मर्मभेदी शैलीत थोडक्यात त्यांना फारसे न दुखावता नक्कीच टीका केली. विशेष म्हणजे, देहबोलीतून अर्थ काढत बसू नका, हा मेळावा केवळ मराठीच्या मुद्द्यावर आहे, कोणताही राजकीय अजेंडा नाही, असेही ते भाषणातून सतत अधोरेखित करीत होते. थोडक्यात, त्यावेळचे राज केवळ भावनिक भाऊ नाहीत, ते अधिक सावध आहेत, हा संदेश सर्व कार्यकर्त्यांना नक्कीच पोहोचला आहे.

### उद्धव सेनेपासून काँग्रेस दुरावली..

उद्धव यांनी केवळ राज ही तात्पुरती सोय करवून घेतलेली आहे, असे म्हणूनच म्हणावेसे वाटते आणितेच नेमके सत्य आहे! याउलट, राज ठाकरे यांना उद्धव असे उघड बिलगल्याने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना यापुढे उद्धव सेनेशिवाय कामाला लागा, अशा सूचना आपल्या महत्वाच्या नेत्यांना द्या, असे थेट गांधी परिवाराकडून त्यांना सांगण्यात आले आहे. मात्र, आज तरी शरद पवारांची आणि त्यांच्या राष्ट्रवादीची महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याची मानसीकता नाही.त्यांचे 'वेट अँड वॉच' असे धोरण ठरले आहे. काँग्रेसपेक्षा राज-उद्धव आपल्या अधिक सोयीचे हेच शरद पवारांना वाटत आहे. थोडक्यात, राज्यातली उरली सुरली काँग्रेस एकट्याने महाआघाडीतून बाहेर पडल्याचे दृश्य पाहायला मिळाले तर आश्चर्य वाटू देऊ नका !

### आता 'महायुती' ची भूमिका काय?

आता एक गोष्ट पाहू या. राज ठाकरे जसे उद्धव यांना भेटून एकत्र येऊन मोकळे झाले आहेत, त्याआधी त्यांनी हे असे काही होणार नाही, मी उद्धवशी सत्तेत राजकारणात पुन्हा युती आघाडी नक्की करणार नाही, असा शब्द प्रत्यक्ष भेटून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जरी दिलेला असला तरीही बेसावध न राहण्याची भूमिका भाजपाने घेतलेली आहे आणि त्यादृष्टीने पावले उचलण्याच्या स्पष्ट सूचना तातडीने प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांना देण्यात आलेल्या आहेत. कारण भाजपा, संघ परिवार यांच्या दृष्टिकोनातून फडणवीसांना सर्कस सरकार चालविण्यासाठी आणि आखलेल्या समस्त योजना पूर्ण करण्यासाठी मोकळीक द्या. महायुतीमध्ये एकनाथ शिंदे आणि अजित पवारांना फारसे यशाचे श्रेय मिळणार नाही, याची काळजी घेत एकदम मोकळे सोडा, त्यांना यात अजिबात गुंतवून ठेऊ नका, अशाही सख्त सूचना राज्यातल्या महत्वाच्या भाजपा नेत्यांना वरून देण्यात आल्या आहेत, हे पण विचार करण्यासारखे आहे.

### श्रीराम-भरत भेट नक्कीच नव्हती..

आजही राज ठाकरे यांना 'महायुती' पासून दूर जायचे नाही, तेच 'महायुती' चेही नक्की ठरले आहे म्हणून राज-उद्धव यांच्या मेळाव्यानंतर भाजपा, शिंदे गटाच्या नेत्यांनी टीकेतून केवळ उद्धवजींना 'टार्गेट' केले. कुठेही त्यात राज ठाकरेंवर टीका नव्हती. महत्वाचे तेच आहे, की ही काही राम आणि भरत भेट नक्कीच नव्हती ! तो जिव्हाळा, पूर्वीचे ते प्रेम त्यात अजिबात नव्हते. तर गरजेतून आणि सत्तेच्या तडफडीतून उद्धव कधी नव्हे ते चार पावले मागे आले, बॅकफूटवर आले! त्यांनीही स्वतःची तात्पुरती सोय लावून घेतली आहे..त्यांचे कार्यकर्ते खुश आहेत आणि महाविकास आघाडी अधांतरी झाली आहे !

### भाजपाचा गेम तर नाही ना?

या सर्व घडामोडीमागे चाणक्यनीती नक्कीच असावी. एकूणच उद्धव ठाकरेंवर खतरनाक गेम झाला आहे, असेच वाटते. मुंबई महापालिकेची निवडणूक डोळ्यासमोर धरली तर ३५ टक्के मराठा मतदान, त्यातील २० टक्के जाणार 'महायुती' ला..१० टक्के उद्धव यांना आणि शिल्लक अन्य ठिकाणी! पण, महत्वाचं म्हणजे जे हिंदी भाषिक मतदान आहे, ते सगळं 'महायुती' ला मिळणार, यात काही शंका नाही. त्यामुळे राज ठाकरेंना सुमारे २५ टक्के, एकनाथ शिंदेंना सुमारे ३० टक्के आणि भाजपला ४० टक्के जागा, थोड्याफार अजित दादांना.. असा हा फॉर्म्युला निश्चित ठरलेला आहे. देवेंद्र फडणवीस आणि राज ठाकरे यांनी मिळून 'महा विकास आघाडी' ची 'महा भकास आघाडी' ला करून टाकली आहे, यावर विश्वास ठेवण्यासारखी वस्तुस्थिती आहे, हे निश्चित !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# धर्मांतराच्या विरोधात कायदा करणार!

## राज्यभरातील अनाधिकृत धार्मिक स्थळांवर कारवाई

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**फसवणूक करून, विविध प्रलोभने दाखवून किंवा जबरदस्तीने होणाऱ्या धर्मांतरणावर आळा घालण्यासाठी कठोर कायदा आणण्यात येणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी विधानसभेत दिली. राज्यभरातील अनाधिकृत धार्मिक स्थळांवर कारवाई करण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली.**




नंदुरबार जिल्ह्यातील अनधिकृत धार्मिक स्थळांच्या बांधकामाबाबत अनुप अग्रवाल यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान अतुल भातखळकर, सुधीर मुनगंटीवार, डॉ. संजय कुटे, गोपीचंद पडळकर, शंकर जगताप यांनी राज्यात धर्मांतर विरोधात कठोर कायदा करण्याची तसेच आदिवासींचे फसवणूक करून ख्रिश्चन धर्मात धर्मांतर केले जात असल्याचा आरोप करीत अनाधिकृत धार्मिक स्थळांवर कठोर कारवाईची मागणी केली.त्यावर फसवणूक करून, विविध प्रलोभने दाखवून किंवा जबरदस्तीने होणाऱ्या धर्मांतरणावर आळा घालण्यासाठी मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून गृह विभागाच्या माध्यमातून कडक कायदा करण्यात येईल. तसेच न्यायालयाच्या आदेशानुसार अनधिकृत धार्मिक स्थळांवर कारवाई करण्यात येईल असे बावनकुळे यांनी सांगितले. यावेळी आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके म्हणाले, धर्मांतरण केलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील नागरिकांना त्यांच्या मूळ प्रवर्गाच्या लाभाची तपासणी करण्याबाबत अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या आमदारांची बैठक घेण्यात येईल. तसेच आदिवासी कुटुंबातील जबरदस्तीने धर्मांतरण केलेल्या नागरिकांना परत हा अनुसूचित जमाती प्रवर्गाचा लाभ देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. यासाठी अनुसूचित जमाती प्रवर्गातील आमदारांची समिती गठीत करण्यात येईल. या समितीमार्फत चौकशी करून एखाद्या विशेष योजनेचे नियोजन या घटकांसाठी करता येईल का, याचीही पडताळणी करण्यात येईल.नंदुरबार जिल्ह्यातील अनधिकृत धार्मिक स्थळांच्या बांधकामाबाबत अनुप अग्रवाल यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान अतुल भातखळकर, सुधीर मुनगंटीवार, डॉ. संजय कुटे, गोपीचंद पडळकर, शंकर जगताप यांनी राज्यात धर्मांतर विरोधात कठोर कायदा करण्याची तसेच आदिवासींचे फसवणूक करून ख्रिश्चन धर्मात धर्मांतर केले जात असल्याचा आरोप करीत अनाधिकृत धार्मिक स्थळांवर कठोर कारवाईची मागणी केली.त्यावर फसवणूक करून, विविध प्रलोभने दाखवून किंवा जबरदस्तीने होणाऱ्या तसेच न्यायालयाच्या आदेशानुसार अनधिकृत धार्मिक स्थळांवर कारवाई करण्यात येईल असे बावनकुळे यांनी सांगितले. यावेळी आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके म्हणाले, धर्मांतरण केलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील नागरिकांना त्यांच्या मूळ प्रवर्गाच्या लाभाची तपासणी करण्याबाबत अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या आमदारांची बैठक घेण्यात येईल.

### कठोर कायदा आणण्यात येणार

तसेच आदिवासी कुटुंबातील जबरदस्तीने धर्मांतरण केलेल्या नागरिकांना परत हा अनुसूचित जमाती प्रवर्गाचा लाभ देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. यासाठी अनुसूचित जमाती प्रवर्गातील आमदारांची समिती गठीत करण्यात येईल. या समितीमार्फत चौकशी करून एखाद्या विशेष योजनेचे नियोजन या घटकांसाठी करता येईल का, याचीही पडताळणी करण्यात येईल. फसवणूक करून, विविध प्रलोभने दाखवून किंवा जबरदस्तीने होणाऱ्या धर्मांतरणावर आळा घालण्यासाठी कठोर कायदा आणण्यात येणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी विधानसभेत दिली. राज्यभरातील अनाधिकृत धार्मिक स्थळांवर कारवाई करण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली.

# शासकीय सेवेतील ३५ टक्के पदे रिक्त

## कंत्राटी ऐवजी लोकसेवा आयोगाकडून भरती करावी

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राज्य सरकारच्या विविध विभागात जवळपास अडीच लाखाहून अधिक म्हणजेच मंजूर पदांच्या ३५ टक्के पदे रिक्त असून ही पदे कंत्राटीद्धतीने न भरता राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून वैधानिक मार्गाने भरण्याची मागणी राजपत्रित अधिकारी महासंघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.**




राज्यात पुन्हा एकदा महाभरती सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी दोनच दिवसांपूर्वी विधानसभेत केली होती. राज्यभरातील अधिकाऱ्यांचे नेतृत्व करणाऱ्या राजपत्रित अधिकारी महासंघाने सरकारच्या महाभरती बाबतच्या घोषणेचे स्वागत करताना शासनाच्या सेवेतील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीऐवजी वैधानिक मार्गाने समयमर्यादित भरण्याची मागणी केली आहे. महासंघाचे अध्यक्ष विनोद देसाई आणि सरचिटणीससमीर भाटकर यांनी याबाबत मुख्यमंत्र्याना पत्र पाठवून ही मागणी केली आहे. त्यात सरकारच्या सर्वच प्रशासकीय विभागांत दरवर्षी जवळपास ३टक्के पदे निवृत्तीने रिक्त होत असताना, गेल्या आठ-दहा वर्षांत नवीन भरतीचे प्रमाण अत्यल्प आहे. सद्यःस्थितीत विविध संवर्गात अडीच लाखांहून अधिक म्हणजेच एकूण मंजूर पदांच्या (७.१७ लाख) तब्बल ३५ पदे रिक्त आहेत.राज्य शासनातील बहुतांश प्रशासकीय विभागांचे आकृतीबंध हे त्यांच्या निर्मितीपासून अद्याप सुधारण्यात आलेले नाहीत, त्याकरीता पदभरतीवर असलेली मर्यादा शिथील करण्यात येऊन, सुधारीत आकृतीबंध; अद्ययावत सेवाप्रवेश नियम,अभ्यासक्रम अंतर्भूत नसतानाही पदोन्नतीपूर्वी रद्द झालेल्या सेवाप्रवेश नियमांतील परीक्षा उत्तीर्ण करण्याची नियमविरोधी जाचक अट रद्द करावी, तसेच विभागांतील ज्येष्ठता याद्या विहित मर्यादित सादर करण्याकरीता संबंधित विभागप्रमुखांना आदेश देण्यात यावेत.

### ज्यात पुन्हा एकदा महाभरती सुरु

ही रिक्त पदे कंत्राटी पध्दतीऐवजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगासारख्या यंत्रणेमार्फत विहित मार्गाने समयमर्यादित भरण्यात यावीत अशी मागणी करण्यात आली आहे.परिणामी वाढते औद्योगिकीकरण, नागरीकरण तसेच लोकाभिमुख प्रशासनाची प्रभावी अंमलबजावणी करण्यास मर्यादा येत आहेत. त्याचबरोबर, सरकारच्या विविध विभागांतील कंत्राटी पदभरती प्रक्रियेत झालेले गैरप्रकार व त्यामुळे लांबलेली पदभरती लक्षात घेता त्याऐवजी लोकसेवा आयोगाकडून भरती करावी अशी मागणी करण्यात आली आहे.राज्यात पुन्हा एकदा महाभरती सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी दोनच दिवसांपूर्वी विधानसभेत केली होतीअधिकारी महासंघाने सरकारच्या महाभरती बाबतच्या घोषणेचे स्वागत करताना शासनाच्या सेवेतील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीऐवजी वैधानिक मार्गाने समयमर्यादित भरण्याची मागणी केली आहे.

# भारत, नामिबियादरम्यान करार!

## मोदी यांनी नामिबियाच्या अध्यक्षच्याबरोबर चर्चा केली

